MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १९ अंक : १ पाने : ८ डिसेंबर २०२३-जानेवारी २०२४ www.mahatransco.in Follow us on :

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

कोणत्याही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी व चांगल्या प्रगतीसाठी ऊर्जा हा अतिशय महत्त्वाचा घटक असतो. देशाची एकूण प्रगती ही ऊर्जा क्षेत्रातील प्रगतीशी संलग्नित असते. ऊर्जा क्षेत्रामध्ये महाराष्ट्र राज्य सातत्याने प्रगतीच्या दिशेने अग्रभागी राहिले आहे. केंद्र सरकारच्या "हर घर बिजली" घोषणेला पूरक असे प्रयत्न करण्यात महापारेषण व इतर वीज क्षेत्रांशी निगडित कंपन्या सतत प्रयत्नशील आहेत.

भारतीय ऊर्जा क्षेत्र हे मोठया प्रमाणात

- **अधिकाऱ्यांनी एकमेकांशी समन्वय ठेवावा**
- **कामांची गती वाढविण्याची आवश्यकता**
- **कामांचा पाठपुरावा करण्याची गरज**
- **सांघिक कामगिरीमुळे अडचणींवर मात**

बदलत आहे. या बदलास पूरक असा शासकीय खर्च देखील राज्य शासन व केंद्र शासन विविध योजनांव्दारे वाढवत आहे. विजेच्या वाढत्या मागणी सोबतच नियमित व अखंडित वीज पुरवणे हे आव्हान नेहमीच वाढत जाणार आहे. केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी प्रत्येक घरामध्ये वीज प्रकल्पाचे ध्येय गाठणे हे वीज क्षेत्रातील प्रत्येक भागधारकाचे प्रथम ध्येय झाले आहे. यामध्ये पारेषण प्रणालीचा वाटा हा महत्त्वाचा व आव्हानात्मक आहे.

महापारेषण यंत्रणेचे सक्षमीकरण व आधुनिकीकरण करण्यासाठी महावितरण व महानिर्मिती तसेच इतर वीजनिर्मिती व वीज वितरण कंपन्यांशी समन्वय साधून आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे ठरते. त्यासाठी आवश्यक पुढाकार घेणे हे महापारेषणमधील प्रत्येक विभागाचे व कर्मचाऱ्यांचे प्रथम कर्तव्य असले पाहिजे. त्यामध्ये कोणतीही उणीव आपण ठेवणार नाहीत, याचा मला विश्वास आहे.

कंपनीच्या कामाचा आढावा घेताना मी पाहतो की, बऱ्याच ठिकाणी कामाची गती वाढविण्याची आवश्यकता आहे. काही ठिकाणी दिलेल्या निर्देशांचे पालन अधिकारी करताना दिसत नाहीत. त्यामुळे काही ठिकाणी कामे रेंगाळलेली दिसून येतात. त्याबाबतच्या अडचणी वरिष्ठांना वेळेत निदर्शनास न आणल्यामुळे जेव्हा मुख्य कार्यालय आढावा घेते, त्यावेळी त्या अडचणी उपस्थित केल्या जातात. त्यामुळे एकंदरीत आढावा व नियंत्रणाबाबत क्षेत्रीय पातळीवर दक्ष राहायला हवे. माझी अशी धारणा आहे की, कोणत्याही अडचणींवर सांघिक प्रयत्नांनी मात करता येऊ शकते. नियंत्रण अधिकारी आपल्या स्तरावर आपल्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर योग्य नियंत्रण ठेवतील, अशी मला आशा आहे. कामाचा तत्पर आढावा व नियंत्रण यशाचे गमक असते.

कंपनीचे यश हे त्यामधील कर्मचारी आपापसात कशा पध्दतीने संवाद (Communication) साधतात व एकत्रित कार्य हाताळतात यावर अवलंबून असते. सांघिक कार्य हे कंपनीच्या दैनंदिन कामकाजाचा महत्त्वाचा भाग आहे. त्याचा फायदा हा काम करण्यासाठी आवश्यक ती प्रेरणा निर्माण करण्यात होतो. त्यामुळे कामाप्रती निष्ठा व आदर तयार होऊन कार्य उत्तमरित्या पूर्ण करता येते. सांघिक कामगिरीमुळे कठीण कामही पूर्णत्वास नेणे सहज शक्य होते. अशाच सांघिक कार्याचा अंतर्भाव करण्यात आपण मागे पडता कामा नये. नवनवीन गोष्टी शिकण्याची आस व त्यासाठी प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्याकरिता केलेले प्रयत्न हे नेहमीच कंपनीच्या यशस्वी वाटचालीकरिता फायद्याचे ठरते. मानव संसाधन विभाग कर्मचाऱ्यांना अशा नवनवीन



**डॉ. संजीव कुमार** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

गोष्टी शिकण्याची संधी प्रशिक्षण विभागाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देत असते. कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचा चांगल्या पध्दतीने फायदा घेतला पाहिजे व प्रत्येकाने कंपनीच्या वाढीमध्ये आपला हातभार लावला पाहिजे.

नेतृत्वगुणांचा वापर हा आपल्या सहकर्मचा-यांना प्रेरित करण्यासाठी करुन त्यांना सक्रियतेने संघटन बांधण्यासाठी केला पाहिजे. सर्व विभागप्रमुख व प्रत्येक छोटया-छोटया विभागाचे प्रमुख आपल्या नेतृत्वाने एक चांगला मार्ग आपल्या सहकर्मचाऱ्यांना दाखवतील, असा मला विश्वास आहे.

सुयोग्य व्यवस्थापन, चांगले नेतृत्व, कामाची सुयोग्य विभागणी, नियमित देखरेख, कामाप्रती निष्ठा अशा सर्वगुणांचा एकत्रित अंतर्भाव करुन प्रत्येक जण कंपनीच्या यशस्वी वाटचालीत आपले योगदान देतील, याची मला खात्री आहे.

**शुभेच्छांसह..!**

**– डॉ. संजीव कुमार**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक




प्रकाशगंगा इमारत, मुंबई : महापारेषणच्या वार्षिक दैनंदिनी व प्लॅनरचे प्रकाशन करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार. शेजारी संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, कंपनी सचिव विनीता श्रीवाणी, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, मुख्य अभियंता श्रीमती जुईली वाघ, श्रीमती ज्योती चिमटे, श्री. सुनील शेरेकर, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. संतोष आंबेरकर, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. नितीन कांबळे, श्री. अभय रोही, शिष्टाचार अधिकारी श्री. सतीश जाधव.

### ▶ वरिष्ठ अधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती

# महापारेषणच्या वार्षिक दैनंदिनी व दिनदर्शिका-२०२४ चे थाटात प्रकाशन

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या वार्षिक दैनंदिनी, प्लॅनर व दिनदर्शिका-२०२४ चे प्रकाशन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या हस्ते झाले.

यावेळी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, कंपनी सचिव विनीता श्रीवाणी, मुख्य महाव्यवस्थापक (विवले) श्री. संतोष आंबेरकर, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. मंगेश शिंदे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, मुख्य अभियंता श्रीमती जुईली वाघ, श्री. सुनील शेरेकर, अधीक्षक अभियंता श्रीमती ज्योती चिमटे, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) श्री. संजीवकुमार बद्देला, श्री. एकनाथ ढेंगळे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक (मा. सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. नितीन कांबळे, उपमहाव्यवस्थापक (मासं.आस्थापना) श्री. अभय रोही, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, सहाय्यक विधी अधिकारी श्रीमती कावेरी साप्ते, श्री. पारस सवाई, श्री. महेश आंबेकर, श्रीमती रेणुका नाटके उपस्थित होते. सुरुवातीला महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी नववर्षाच्या शुभेच्छा देऊन उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना संदेश दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी मानले.



प्रकाशगंगा इमारत, मुंबई : महापारेषणच्या वार्षिक दिनदर्शिका-२०२४ चे प्रकाशन करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार. शेजारी संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, कंपनी सचिव विनीता श्रीवाणी, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे व अन्य वरिष्ठ अधिकारी.

## डिजिटल क्यू-आर दैनंदिनी व दिनदर्शिका

महापारेषणच्या जनसंपर्क विभागाने कायमच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. यावर्षी मराठी, इंग्रजी दैनंदिनी, प्लॅनर व दिनदर्शिका-२०२४ ही क्यू-आर कोड वापरून संपूर्णतः डिजिटल पध्दतीने बनविली आहे. महाराष्ट्रामध्ये शासकीय विभागात संपूर्ण क्यू-आर कोडसह डिजिटल पध्दतीने मराठी, इंग्रजी, प्लॅनर व दैनंदिनी बनविणारी महापारेषण ही पहिली कंपनी ठरली आहे. त्यामुळे महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी जनसंपर्क विभागाचे कौतुक केले आहे.



Sports

एक हजार अधिकारी व कर्मचारी सहभागी

# महापारेषणच्या आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धा कोल्हापुरात थाटात संपन्न



**कोल्हापूर :** येथील शिवाजी विद्यापीठात महापारेषणच्या आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. स्पर्धेचे उदघाटन महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संचालक (प्रकल्प) श्री. सुनिल सुर्यवंशी, मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप, श्री. भूषण बल्लाळ, श्रीमती शिल्पा कुंभार, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, क्रीडा सचिव श्री. प्रांजल कांबळे.



**कोल्हापूर :** येथील शिवाजी विद्यापीठात महापारेषणच्या आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. याप्रसंगी संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, संचालक (प्रकल्प) श्री. सुनिल सुर्यवंशी, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप, श्री. अविनाश निंबाळकर, श्री. संजीव भोळे, श्री. जयंत वीके, श्री. सुनील शेरेकर, श्री. भूषण बल्लाळ, श्री. महेंद्र वाळके, श्रीमती शिल्पा कुंभार, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, क्रीडा सचिव श्री. प्रांजल कांबळे व खेळाडू.

Follow us on :

कोल्हापुरच्या शिवाजी विद्यापीठात महापारेषणच्या आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. स्पर्धेचे उदघाटन महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांच्या हस्ते झाले.

यावेळी संचालक (प्रकल्प) श्री. सुनिल सुर्यवंशी, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप, छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. अविनाश निंबाळकर, नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. संजीव भोळे, अमरावती परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. जयंत वीके, सांघिक कार्यालयातील मुख्य अभियंता श्री. सुनील शेरेकर, श्री. भूषण बल्लाळ, वाशी परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, कराड परिमंडलाच्या मुख्य अभियंता श्रीमती शिल्पा कुंभार, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी तथा मुख्य समन्वयक श्री. भरत पाटील, अधीक्षक अभियंता तथा क्रीडा सचिव श्री. प्रांजल कांबळे उपस्थित होते.

यामध्ये कबड्डी, व्हॉलीबॉल, क्रिकेट, बॅडमिंटन, टेबल टेनिस, कॅरम, बुध्दीबळ, कुस्ती, ॲथलेटिक्स स्पर्धा घेण्यात आल्या. आठ परिमंडलातील सुमारे एक हजार अधिकारी व कर्मचारी या स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अधीक्षक अभियंता श्री. श्रीकृष्ण नवलाखे, श्री. चिदाप्पा कोळी, श्री. अशोक सागरे, श्री. संजय किंकर, श्री. राजेश केळवकर, सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. प्रशांत चौधरी यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.




**कोल्हापूर :** महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री यांच्यासोबत विजेता संघ.

## सांघिक भावना कायम ठेवा : डॉ. संजीव कुमार

आंतरपरिमंडलीय स्पर्धेमध्ये आठ संघांमध्ये सर्वोत्कृष्ट विजेतेपदासाठी चुरस पहायला मिळाली. यामध्ये खेळाडूंनी सांघिक भावना ठेवून खिलाडीवृत्ती दाखवली. महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी चांगली कामगिरी करून स्पर्धेत चमक दाखवली, त्याबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले. तसेच भविष्यात होणाऱ्या क्रीडा स्पर्धेसाठी त्यांनी खेळाडूंना भरभरून शुभेच्छा दिल्या.




**मुंबई :** महापारेषणच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजिलेल्या कार्यक्रमाचे उद्घाटन करताना मराठी भाषा संचालनालयाचे उपसंचालक श्री. अ. वा. गिते. शेजारी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी श्री. नितीन कांबळे.

## ▶ महापारेषणमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा

# कार्यालयीन कामकाजात मराठी भाषाच वापरा : श्री. अ.वा.गिते

Follow us on :

''दैनंदिन व्यवहाराबरोबर कार्यालयीन कामकाजात मराठी भाषेचाच जास्तीत-जास्त वापर करा. इंग्रजी व हिंदी शब्दाऐवजी मराठी भाषेचाच आग्रह धरायला हवा. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा'', असे आवाहन मराठी भाषा संचालनालयाचे उपसंचालक श्री. अ. वा. गिते यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने १४ ते २८ जानेवारी दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी वांद्रे येथील प्रकाशगड इमारतीच्या सभागृहात आयोजिलेल्या 'शासन व्यवहारात मराठी भाषेचा वापर व अंमलबजावणी' या कार्यक्रमात श्री. गिते बोलत होते.

यावेळी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास



**मुंबई :** कवी व अभिनेता श्री. किशोर कदम ऊर्फ सौमित्र यांची मुलाखत घेताना महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे.


@maha_transco MahaTransco @Mahatranscoltd www.mahatransco.in



**मुंबई :** महापारेषणने वांद्रे येथे आयोजिलेल्या विविध स्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी विजेत्यांसमवेत महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, श्री. कैलास कणसे, श्री. मंगेश शिंदे, श्री. भूषण बल्लाळ, श्री. राजू गायकवाड श्री. भरत पाटील, डॉ. कीर्ती कुळकर्णी, श्रीमती अंजू गुप्ता, श्री. नितीन कांबळे.



**मुंबई :** महापारेषणच्या वतीने आयोजिलेल्या कार्यक्रमात 'शासन व्यवहारात मराठी भाषेचा वापर व अंमलबजावणी' या विषयावर बोलताना मराठी भाषा संचालनालयाचे उपसंचालक श्री. अ. वा. गिते.



**मुंबई :** कवी व अभिनेता श्री. किशोर कदम ऊर्फ सौमित्र यांचा सत्कार करताना महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री.

## मराठी भाषेचाच वापर करा : डॉ. संजीव कुमार

*महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दैनंदिन कामकाजात मराठी भाषेचाच वापर करून महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजिलेला मराठी भाषा संवर्धन पंधरवडा यशस्वी करावा. दैनंदिन व्यवहारातही मराठी भाषेचाच वापर जास्तीत-जास्त करावा, असे आवाहन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी केले. तसेच मराठी भाषा संवर्धन दिनानिमित्त आयोजिलेल्या कार्यक्रमाला त्यांनी शुभेच्छा दिल्या.*

कणसे, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, मुख्य अभियंता श्री. भूषण बल्लाळ, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती अंजू गुप्ता, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी, मराठी भाषा समन्वय अधिकारी श्री. नितीन कांबळे, उपमहाव्यवस्थापक (मा.सं. आस्थापना) श्री. अभय रोही, श्री. किरण वडते उपस्थित होते.

श्री. गिते पुढे म्हणाले, ''मराठी भाषेचे संवर्धन होण्यासाठी दैनंदिन कार्यालयात मराठीचाच वापर करावा. मराठी भाषेच्या प्रसारासाठी शब्द अनुवाद स्पर्धा, मराठी भाषेमध्ये जाहिरात सादरीकरण स्पर्धा व काव्यवाचन स्पर्धा आयोजित केली, हे खरोखरच कौतुकास्पद आहे. अशा स्पर्धांमुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये सांघिक भावना वाढीस लागते.'' सुरुवातीला प्रास्ताविक मराठी भाषा अधिकारी श्री. नितीन कांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. गौतम कांबळे व श्रीमती स्मिता वंजारी यांनी केले. श्री. भरत पाटील यांनी आभार मानले.

## सौमित्र यांच्या बहारदार कवितांनी अधिकारी व कर्मचारी चिंब

*कवी व अभिनेता किशोर कदम ऊर्फ सौमित्र यांनी सादर केलेल्या बहारदार कवितांनी महापारेषणचे अधिकारी व कर्मचारी चिंब झाले. सुरुवातीला 'ऊन जरा जास्त होतं...' पासून सुरू केलेल्या विविध कवितांनी कर्मचाऱ्यांना धो-धो हसविले. सौमित्र ऊर्फ किशोर कदम यांची मुलाखत जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी घेतली. विविध प्रश्नांना कवी सौमित्र यांनी तेवढीच खुमासदार पध्दतीने उत्तरे दिली.*

## निकाल पुढीलप्रमाणे :

**शब्द अनुवाद स्पर्धा–**

पराग पाटील (प्रथम),
दिनेशकुमार कांबळे (व्दितीय),
रविकिरण जांभरूणकर (तृतीय).

**मराठी भाषेमध्ये जाहिरात सादरीकरण स्पर्धा– प्रथम क्रमांक तांत्रिक संवर्ग संघ (सिंहगड संघ)**

श्री. दिनेशकुमार कांबळे,
श्री. पराग पाटील,
श्री. गौतम कांबळे,
श्री. धीरज शेरेकर,
श्री. मनोहर बागले.

**व्दितीय क्रमांक–मानव संसाधन विभाग (रायगड संघ)**

श्रीमती भारती कांबळे,
श्रीमती स्मिता वंजारी,
श्रीमती रेणुका नाटके,
श्रीमती मंजिरी तारगांवकर,
श्री. शिवाजी पाटील.



**मुंबई :** कार्यक्रमाला अधिकारी व कर्मचाऱ्यांची जमलेली मोठी उपस्थिती.

**हृद्य सत्कार** ▶ अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती

# महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार




**मुंबई :** महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त त्यांचा सत्कार करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार.

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे (महापारेषण) संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर हे दि. ३१ जानेवारी रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी त्यांचा सत्कार केला.

श्री. फळणीकर हे दि. २१ ऑगस्ट २०२० मध्ये महापारेषणमध्ये संचालक (वित्त) म्हणून रूजू झाले होते. नियत वयोमानानुसार ते निवृत्त झाले. त्यानिमित्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांच्या सत्काराचे आयोजन केले होते.

याप्रसंगी संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. सुनील सूर्यवंशी, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. संतोष आंबेरकर, मुख्य अभियंता श्री. पीयूष शर्मा, श्री. सुनील शेरेकर, श्रीमती जुईली वाघ, कंपनी सचिव श्रीमती विनीता श्रीवाणी, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, मुख्य महाव्यवस्थापक श्री. नागसेन वानखेडे, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती अंजू गुप्ता, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. राजेश पवार, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती सीमा डुबेवार, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, शिष्टाचार अधिकारी श्री. सतीश जाधव उपस्थित होते.

या वेळी डॉ. संजीव कुमार यांनी आपल्या मनोगतात श्री. फळणीकर यांच्या सकारात्मक कामांचे कौतुक केले. त्यांनी केलेल्या कामांमुळे भविष्यातही कंपनीला फायदा होईल. त्यांनी उर्वरित आयुष्यात त्यांचे छंद जोपासावेत, असे सांगितले.

याप्रसंगी संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. संतोष आंबेरकर, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती अंजू गुप्ता, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. तसेच श्री. फळणीकर यांचे कुटुंबीयही यावेळी उपस्थित होते.

श्री. फळणीकर यांनी कंपनीविषयी कृतज्ञता व्यक्त करून सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. संतोष आंबेरकर, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती आरती रामटेके यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक लेखापाल (वित्त व लेखा) श्री. सुशील घाडगे यांनी केले.

आमच्याशी कनेक्टेड रहा
@maha_transco | @maha_transco | MahaTransco
MahaTransco | Mahatranscoltd | MahaTransco

महामानवाला अभिवादन

▶ अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त महापारेषणमध्ये अभिवादन

Follow us on :

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. सुनिल सूर्यवंशी, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य अभियंता श्री. सुनील शेरेकर, श्रीमती जुईली वाघ, श्री. भूषण बल्लाळ, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, मुख्य विधी सल्लागार डॉ. किर्ती कुळकर्णी, उपमहाव्यवस्थापक (मा. सं) श्री. नितीन कांबळे यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.





**मुंबई :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार. शेजारी संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. सुनिल सूर्यवंशी, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य अभियंता श्री. सुनील शेरेकर, मुख्य विधी सल्लागार डॉ. किर्ती कुळकर्णी व अन्य वरिष्ठ अधिकारी.

सावित्रीमाईना अभिवादन

▶ महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती महापारेषणमध्ये उत्साहात साजरी

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९३ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

सुरूवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. मंगेश शिंदे, मुख्य अभियंता (प्रकल्प योजना) श्री. जुईली वाघ, महाव्यवस्थापक (विवले) श्रीमती अंजू गुप्ता, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन) श्री. नितीन कांबळे, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. अभय रोही, अधीक्षक अभियंता श्री. रंगनाथ चव्हाण, श्री. अमित नाईक, श्री. एकनाथ ढेंगळे, श्रीमती ज्योती चिमटे, श्रीमती शारदा ताकपेरे, श्री. संजीवकुमार बद्देला, श्री. सचिन खडगी, श्री. किरण वडते, उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. प्रशांत गोरडे यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्रीमती सीमा डुबेवार, वरिष्ठ व्यवस्थापक (मा.सं.) श्रीमती प्रणिता ताम्हाणे व वैशाली वाघमारे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्रीमती भारती कांबळे यांनी मानले.





मुंबई : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९३ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) शेजारी अन्य अधिकारी.




प्रजासत्ताक दिन चिरायू होवो

# महापारेषणमध्ये ७५ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात



Follow us on :

महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे ७५ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच महापारेषणच्या सात परिमंडळ कार्यालयांमध्येही प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम घेण्यात आले. प्रकाशगंगा येथील मुख्यालयात महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी ध्वजारोहण केले. यावेळी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. सुनील सूर्यवंशी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य अभियंता श्रीमती जुईली वाघ, मुख्य अभियंता श्री. पीयूष शर्मा, श्री. भूषण बल्लाळ, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**मुंबई :** महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे ध्वजारोहणप्रसंगी मानवंदना देताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.). दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित वरिष्ठ अधिकारी वर्ग.

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, वांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **Dr.Milind Awatade** PRO for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,** Printed at **Jyotirling Enterprises :** 315-B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N.M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 23002574 & Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai - 400 051. The Company accepts no responsibility for the matter published in the journal.